प्रकरण - I

पंचायती राज संस्थांची कार्यपध्दती, उत्तरदायित्व कार्यतंत्र आणि वित्तीय प्रतिवेदन बाबींचा आढावा

प्रकरण - I

पंचायती राज संस्थांची कार्यपद्धती, उत्तरदायित्व कार्यतंत्र आणि वित्तीय प्रतिवेदन बाबींचा आढावा

1.1 प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेतील 73[व्या] दुरुस्तीने पंचायती राज संस्थांना घटनात्मक दर्जा दिला आणि समान रचना, नियमित निवडणूक आणि वित्त आयोगामार्फत निधीचा नियमित ओघ अशी व्यवस्था प्रस्थापित केली. त्याचा पाठपुरावा म्हणून राज्य शासनांनी निधी, भारतीय राज्यघटनेच्या 11[व्या] अनुसूचीत समाविष्ट केलेली 29 कामे आणि पदाधिकाऱ्यांचे हस्तांतरण करणे आणि पंचायती राज संस्थांकडे अधिकार, कार्ये आणि जबाबदाऱ्या सोपविणे आवश्यक होते, जेणेकरून त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून कार्य करता येईल.

त्यानुसार, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 आणि महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, 1958 मध्ये सुधारणा (1994) केल्या.

1.1.1 राज्य रूपरेखा

सन 2011 च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण 11.24 कोटी लोकसंख्येपैकी 6.16 कोटी (55 टक्के) ग्रामीण भागाची लोकसंख्या होती. वर्ष 2011 च्या जनगणनेनुसार राज्याची जनसांख्यिकीय व विकासात्मक स्थिती **तक्ता 1.1.1** मध्ये दिलेली आहे.

तक्ता 1.1.1: राज्याची महत्त्वाची आकडेवारी (2011 च्या जनगणनेनुसार)

निर्देशांक	विदा
लोकसंख्या (कोटींमध्ये)	11.24
लोकसंख्या घनता (प्रती चौरस किमी)	365
लिंग गुणोत्तर - स्त्री: पुरुष	929:1000
ग्रामीण लोकसंख्या (कोटींमध्ये)	6.16
साक्षरता- ग्रामीण (टक्केवारीत)	77.09
पंचायती राज संस्थांची एकूण संख्या	28,217
(i)जिल्हा पंचायतींची संख्या (जिल्हा परिषद)	34
(ii) गट पंचायतींची संख्या (पंचायत समित्या)	351
(iii) ग्राम पंचायतींची संख्या (ग्रामपंचायत)	27,832
स्त्रोत: महाराष्ट्राचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल 2021-22	

1.2 पंचायती राज संस्थांची संघटनात्मक संरचना

पंचायती राज संस्थांमध्ये जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदा, गट स्तरावर पंचायत समित्या आणि गाव पातळीवर ग्रामपंचायत या तीन स्तरांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांची संघटनात्मक संरचना **आलेख 1** मध्ये दर्शविली आहे:

आलेख 1: पंचायती राज संस्थांची संघटनात्मक संरचना



महाराष्ट्र शासनाचा ग्रामविकास व पंचायत राज विभाग हा राज्य स्तरावर पंचायती राज संस्थांचा नोडल विभाग आहे. जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समितीमध्ये गट विकास अधिकारी आणि ग्राम पंचायतीमध्ये ग्राम विकास अधिकारी/ग्राम सेवक हे कार्यात्मकरित्या संबंधित निर्वाचित पदाधिकाऱ्यांना आणि प्रशासकीयदृष्ट्या राज्य शासनाच्या पदानुक्रमातील त्यांच्या निकटच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कामकाजाचा अहवाल सादर करतात.

मार्च 2022 पर्यंत महाराष्ट्रातील 43,665 गावांसाठी 27,832 ग्राम पंचायत होत्या. ग्राम स्तरावर कार्यरत असलेला ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक, हा ग्राम पंचायतीचा सचिव म्हणून काम पाहतो आणि तो ग्राम पंचायत स्तरावर लेखे व अभिलेखे ठेवण्यासाठी जबाबदार असतो.

मार्च 2021[1] पर्यंत राज्यातील 27,832 ग्राम पंचायतींच्या तुलनेत ग्रामविकास अधिकारी/ग्राम सेवकांची मंजूर पदे केवळ 22,793 (82 टक्के) होती. मार्च 2021 पर्यंत 20,546

[1] ग्रामीण विकास आणि पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून ऑक्टोबर 2022 मध्ये प्राप्त माहिती.

(90 टक्के) नियुक्त आणि 2,247 (10 टक्के) ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवकांची कमतरता होती.

1.3 पंचायती राज संस्थांची कार्यपद्धती

1.3.1 महाराष्ट्र राज्यात 36 जिल्हे असून त्यापैकी दोन जिल्हे उदा. मुंबई शहर आणि मुंबई उपनगरांमध्ये ग्रामीण भाग नाही. उर्वरित 34 जिल्ह्यांमध्ये जिल्हा मुख्यालयात जिल्हा परिषदा आहेत. ह्या जिल्हा परिषदांमध्ये शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, लघु पाटबंधारे, ग्रामीण पाणी पुरवठा, समाज कल्याण, पशू संवर्धन, कृषी, महिला व बाल कल्याण, वित्त, सामान्य प्रशासन आणि ग्राम पंचायत इत्यादिकरिता स्वत:चे विभाग आहेत.

1.3.2 जिल्ह्यांचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी आणि साधनसंपत्तीचा वापर करण्यासाठी जिल्हा परिषदांना अंदाजपत्रक तयार करावे लागते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून केंद्र शासनाच्या योजनांना निधी पुरविला जातो आणि राज्य शासनाच्या योजना देखील जिल्हा परिषदांमार्फत राबविल्या जातात. इतर गोष्टींबरोबरच जमीन आणि इमारतींवर पाणीपट्टी, तीर्थक्षेत्र कर आणि जमीन व इमारतीवरील विशेष कराची आकारणी करण्यासाठी जिल्हा परिषदांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

1.3.3 महाराष्ट्रातील गट स्तरावरील पंचायतीचा मध्यम स्तर पंचायत समिती म्हणून ओळखला जातो. राज्यात 351 पंचायत समित्या आहेत. पंचायत समित्यांना महसुलाचा स्वत:च पुरेसा स्त्रोत नसतो आणि त्या जिल्हा परिषदेकडून मिळणाऱ्या अनुदानावर पुर्णपणे अवलंबून असतात. गट स्तरावरील कामे पंचायत समित्या कार्यान्वित करतात.

1.3.4 महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, 1958 मध्ये ग्रामसभेची स्थापना करण्याची तरतूद आहे, जी ग्राम पंचायत क्षेत्रातील गावांच्या मतदार यादीत नोंदणीकृत व्यक्तींचा समावेश असलेली संस्था असते. इमारतींवरील कर, सुधारणा शुल्क, तीर्थक्षेत्र कर, मेळावे/सण/करमणुकीवरील कर, सायकली, जनावरांद्वारे ओढली जाणारी वाहने, दुकाने व उपाहारगृहे इत्यादींवर कर आकारण्याचे अधिकार ग्राम पंचायतींना दिलेले आहेत.

1.3.5 ग्रामसभांची वेळोवेळी बैठक होणे आवश्यक आहे. ते केंद्र/राज्य शासनाच्या योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड करतात, ग्राम पंचायतींद्वारे राबवावयाचे विकास आराखडे आणि प्रकल्प तयार करून मंजूर करतात आणि विकास योजनांवर ग्राम पंचायतींद्वारे करण्यात येणाऱ्या खर्चास परवानगी देतात. तसेच ग्राम पंचायतींच्या भूसंपादनाच्या प्रस्तावांवरही त्यांची मते मांडतात/देतात.

1.3.6 पंचायती राज संस्थांमधील व्यापक उत्तरदायित्वाची रचना **तक्ता 1.1.2** मध्ये दर्शविली आहे**.**

तक्ता 1.1.2: पंचायती राज संस्थांमधील उत्तरदायित्व रचना

पंचायती राज संस्था	नेमून दिलेली कार्ये
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	1. निधीचे आहरण व संवितरण 2. वार्षिक अंदाजपत्रक व लेखे तयार करणे 3. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचे पर्यवेक्षण व नियंत्रण आणि जिल्हा परिषदेच्या सर्व वित्तीय आणि कार्यालयीन कामांची अंमलबाजवणी 4. कंत्राटांना अंतिम रुप देणे
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद	1. जिल्हा परिषदेच्या लेख्यांचे संकलन 2. वित्तीय सल्ला देणे
जिल्हा परिषदेमधील विभागांचे प्रमुख	1. कामांना तांत्रिक मंजुरी देणे आणि विकासात्मक योजना राबविणे 2. वर्ग II अधिकाऱ्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करणे
गट विकास अधिकारी, पंचायत समिती	1. निधीचे आहरण व संवितरण 2. योजनांचे कार्यान्वयन व संनियंत्रण आणि लेखे व अभिलेखे ठेवणे
ग्राम सेवक, ग्राम पंचायत	1. ग्रामसभेचा सचिव म्हणून सचिवाची कार्ये पार पाडणे 2. योजनांचे कार्यान्वयन व संनियंत्रण आणि लेखे व अभिलेखे ठेवणे
स्त्रोत: महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, 1961 आणि महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, 1958	

1.3.7 भारतीय राज्यघटनेच्या XI व्या अनुसूचीत नमूद केलेल्या 29 कार्यांपैकी 15 कार्ये[2] पंचायती राज संस्थांकडे सोपविण्यात आली. शेती, मत्स्यव्यवसाय, सामाजिक वनीकरण, शिक्षण आदींसह उर्वरित 14 कार्ये पंचायती राज संस्थांकडे हस्तांतरित करण्यासाठी प्रलंबित होती (नोव्हेंबर 2022).

सर्व 15 कार्ये पंचायती राज संस्थांकडून केली जात होती, तरी या कार्यांच्या बाबतीत त्यांना पूर्ण अधिकार नव्हते; त्यांनी दहा कार्यांमध्ये अंमलबजावणी अभिकरण म्हणून कार्य केले; त्यांची दोन कार्यांमध्ये दुहेरी भूमिका आहे; त्यांना तीन कार्यांमध्ये राज्य शासनाच्या विभागांबरोबर परस्परव्यापी कार्यक्षेत्र असून त्या भागीदारीत काम करतात. पंचायती राज संस्थांची त्यांची कार्ये पार पाडण्यात मर्यादित भूमिका आहे आणि ती हस्तांतरणाच्या भावनेशी सुसंगत नव्हती.

1.3.8 पंचायती राज संस्थांना वर्ष 2021-22 साठी राज्य शासनाच्या एकूण ₹ 2,40,233.83 कोटींच्या महसुली जमांपैकी ₹ 29,417.83 कोटी (12.25 टक्के) वाटप करण्यात आले. केंद्रीय कर/शुल्कातील हिस्सा ₹ 54,318.06 कोटी, भारत सरकारकडून सहाय्यक अनुदाने ₹ 38,759.68 कोटी आणि वस्तू व सेवा कराऐवजी भरपाई म्हणून ₹ 17834.22 कोटी होती.

2 (i) लघु पाटबंधारे, जल व्यवस्थापन आणि पाणलोट विकास, (ii) पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन, (iii) ग्रामीण गृहनिर्माण, (iv) पेय जल, (v) रस्ते, कालवे, पूल, फेरी, जलमार्ग आणि दळणवळणाची इतर साधने, (vi) अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत, (vi) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम, (viii) प्रौढ व अनौपचारिक शिक्षण, (ix) ग्रंथालये, (x) सांस्कृतिक कार्ये, (xi) रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने यासह आरोग्य व स्वच्छता, (xii) महिला व बालविकास, (xiii) अपंग आणि मनोरुग्णांच्या कल्याणासहीत समाजकल्याण, (xiv) सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि (xv) कुटुंब कल्याण

1.4 विविध समित्यांची स्थापना

भारतीय राज्यघटनेचे कलम 243 झेडडी नुसार प्रत्येक राज्यात जिल्हा पातळीवर जिल्हा नियोजन समिती स्थापन करणे अपेक्षित आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियमानुसार प्रत्येक जिल्हा परिषदेत खण्ड 78-80 अंतर्गत विविध समित्या म्हणजेच स्थायी समिती, वित्त समिती, कार्य समिती, कृषी समिती, समाज कल्याण समिती, शिक्षण समिती, आरोग्य समिती, पशु संवर्धन आणि दुग्ध व्यवसाय समिती, जल व्यवस्थापन आणि स्वच्छता समिती इत्यादी स्थापण्याची तरतूद आहे.

जिल्हा पातळीवरील जिल्हा नियोजन समितीची विधिवत स्थापना 22[3] जिल्हा परिषदांमध्ये करण्यात आली होती आणि उर्वरित 12[4] जिल्हा परिषदांमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या स्थापनेची माहिती देण्यात आली नव्हती. 26 जिल्हा परिषदांमध्ये इतर समित्या विधिवत स्थापन करण्यात आल्या आणि उर्वरित आठ[5] जिल्हा परिषदांनी (सप्टेंबर 2022) कोणतीही माहिती सादर केली नाही.

1.5 लेखापरीक्षण व्यवस्था

1.5.1 प्राथमिक लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षण

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील राज्यातील सर्व पंचायती राज संस्थांसाठी संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा हे वैधानिक लेखापरीक्षक आहेत. पंचायती राज संस्था व ग्राम पंचायतींच्या लेखापरीक्षणा व्यतिरिक्त संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा हे जिल्हा परिषदांमधील प्रत्येक विभागाचे लेखापरीक्षण करतात.

लेखापरीक्षण पूर्ण झाल्यावर, मुंबई स्थानिक निधी अधिनियम,1930 मधील नेमुन दिलेल्या नमुन्यात संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा हे लेखापरीक्षण अहवाल तयार करतात आणि लेखापरीक्षीत कार्यालयास जारी करतात. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षक हे पंचायती राज संस्थांना वर्षभरात जारी केलेल्या महत्त्वाच्या लेखापरीक्षण अभिक्षणांचा समावेश असलेले लेखापरीक्षण आढावा अहवाल सुध्दा तयार करतात. ग्रामीण विकास विभागातर्फे लेखापरीक्षण आढावा अहवाल राज्य विधिमंडळासमोर ठेवला जातो.

अनुपालन लेखापरीक्षणाच्या संदर्भात, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी वर्ष 2021-22 दरम्यान सर्व 34 जिल्हा परिषदा आणि 351 ग्राम पंचायतींचे लेखापरीक्षण पूर्ण केले. त्याचप्रमाणे 57,152 ग्राम पंचायतींपैकी (यामध्ये ग्राम पंचायतींच्या मागील वर्षांच्या प्रलंबित लेखापरीक्षणाचा समावेश आहे) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी 2021-22 मध्ये 44,398 ग्राम पंचायतींचे लेखापरीक्षण पूर्ण केले होते.

---

[3] अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, जळगाव, लातूर, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर आणि ठाणे

[4] अहमदनगर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, कोल्हापूर, पालघर, सांगली, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ

[5] अहमदनगर, भंडारा, गोंदिया, हिंगोली, जालना, कोल्हापूर, वाशीम आणि यवतमाळ

मुंबई स्थानिक निधी अधिनियम, 1930 नुसार, संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षक यांनी लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत लेखापरीक्षित कार्यालयाला लेखापरीक्षा अहवाल जारी करणे आवश्यक होते. वर्ष 2021-22 दरम्यान (जुलै 2021 ते जून 2022) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांना जारी केलेल्या 760 लेखापरीक्षा अहवालांपैकी, 669 (88 टक्के) लेखापरीक्षा अहवाल नियत वेळेत जारी केले होते. तसेच, 29 जिल्ह्यांतील[6] वर्ष 2021-22 दरम्यान ग्राम पंचायतींना जारी केलेल्या 19,686 लेखापरीक्षा अहवालांपैकी 16,605 (84 टक्के) लेखापरीक्षा अहवाल नियत वेळेत जारी केले होते.

जून 2022 पर्यंत वर्ष 2011-22 पर्यंत पूर्ण झालेल्या लेखापरीक्षणांपैकी दुर्विनियोग अफरातफर, अपहार इत्यादीशी संबंधित ₹ 100.93 कोटी अंतर्भुत असलेली 1,767 लेखापरीक्षण अभिक्षणे जिल्हा परिषदा/पंचायत समित्यांकडे प्रलंबित होती. तसेच, जून 2022 पर्यंत ₹ 594.92 कोटी अंतर्भुत असलेली 37,706 लेखापरीक्षा अभिक्षणे ग्राम पंचायतींकडे प्रलंबित होती.

राज्य विधिमंडळाने स्थापन केलेल्या पंचायत राज समितीमध्ये लेखापरीक्षण आढावा अहवाल चर्चिला जातो. पंचायत राज समितीने 2016-17 पर्यंतचे लेखापरीक्षण अहवाल चर्चिले होते. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी वर्ष 2018-19 चे पंचायती राज संस्थांचे लेखापरीक्षण आढावा अहवाल ग्रामीण विकास आणि पंचायत राज विभागाला सादर केले (ऑगस्ट 2021) आणि ते राज्य विधिमंडळात मार्च 2022 मध्ये सादर केले गेले. वर्ष 2019-20 साठीचे लेखापरीक्षण आढावा अहवाल अजून तयार व्हावयाचे असून राज्य विधिमंडळात सादर करावयाचे आहेत (सप्टेंबर 2022).

1.5.2 भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून लेखापरीक्षण

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, 1971 च्या कलम 14 अन्वये पंचायती राज संस्थांचे लेखापरीक्षण केले जाते. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षक यांना तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षण सुध्दा दिले जाते.

स्थानिक लेखापरीक्षणादरम्यान प्राथमिक लेखे/अभिलेख्यांमध्ये आढळून आलेली परंतू तिथल्या तिथे निराकरण न केलेली वित्तीय अनियमितता व त्रुटी संबंधातील लेखापरीक्षण अभिक्षणे निरीक्षण अहवालांच्या माध्यमातून पंचायती राज संस्थांचे प्रमुख व विभागीय प्राधिकरणांना कळविली जातात. सहा महिन्यांहून अधिक काळ प्रलंबित असलेली लेखापरीक्षणे सुध्दा कारवाईसाठी राज्य शासनाच्या नजरेस आणून दिली जातात.

पंचायती राज संस्थांच्या लेखापरीक्षणातून उद्भवलेली महत्त्वाची लेखापरीक्षण अभिक्षणे भारतीय राज्यघटनेच्या कलम 151(2) अन्वये राज्य विधिमंडळासमोर ठेवण्यात येणाऱ्या

[6] पाच जिल्हा परिषदांनी आकडेवारी सादर केली नाही: अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करण्यासाठी संस्करित केली जातात.

1.6 भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून तांत्रिक मार्गदर्शन आणि पर्यवेक्षण

तेराव्या वित्त आयोगाचा परिच्छेद 10.67 अशी शिफारस (डिसेंबर 2009) करतो की पंचायती राज संस्था आणि नागरी स्थानिक संस्था यांच्या लेखापरीक्षणासाठी आणि लेख्यांसाठी तांत्रिक मार्गदर्शन आणि पर्यवेक्षणाची जबाबदारी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपविण्यात यावी. त्यानुसार, वित्त विभागाने मार्च 2011 च्या शासन निर्णयानुसार तांत्रिक मार्गदर्शन आणि पर्यवेक्षणाची जबाबदारी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपविली. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्या लेखापरीक्षण अहवालावर भाष्य करण्याबरोबरच शासन निर्णयानुसार भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे सुध्दा आवश्यक होते.

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्यावर सोपविलेल्या तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षणाचा एक भाग म्हणून राज्यातील महालेखाकारांचे अधिकारी संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांना दुहेरी नोंद लेखांकन पध्दती (डबल एन्ट्री अकांउंटींग सिस्टीम), आदर्श लेखांकन पध्दती नमुन्यांमध्ये लेखे ठेवणे, लेखापरीक्षा तपासणी, स्थानिक संस्थांमधील ई-गव्हर्नन्स, सांपदणूक लेखापरीक्षणाची ओळख इत्यादी विषयांवर नियमितपणे प्रशिक्षण देतात.

1.7 लेखापरीक्षण अभीक्षणांना प्रतिसाद

1.7.1 महालेखाकारांकडून लेखापरीक्षण झालेल्या पंचायती राज संस्थांचे प्रलंबित निरीक्षण अहवाल

डिसेंबर 2022 पर्यंत, महालेखाकार, महाराष्ट्र यांनी लेखपरीक्षण केलेल्या पंचायती राज संस्थांचे 2,549 निरीक्षण अहवाल (9,102 परिच्छेद) प्रलंबित होते जे **तक्ता 1.1.3** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 1.1.3: प्रलंबित निरीक्षण अहवाल आणि परिच्छेद यांची स्थिती

वर्ष	निरीक्षण अहवाल	परिच्छेद
2017-18 पर्यंत	2,045	6,092
2018-19	257	862
2019-20	143	1,212
2020-21	14	141
2021-22	90	795
एकूण	**2,549**	**9,102**

1.7.2 लेखापरीक्षण अहवाल/वार्षिक तांत्रिक निरीक्षण अहवालात समाविष्ट असलेले परंतु लोक लेखा समितीपुढे चर्चेसाठी प्रलंबित परिच्छेद

डिसेंबर 2022 अखेरीस, वर्ष 2005-06 ते 2015-16 च्या लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट असलेल्या 60 परिच्छेदांपैकी 35 परिच्छेद आणि 2016-17 ते 2018-19 या कालावधीच्या वार्षिक तांत्रिक निरीक्षण अहवालात समाविष्ट केलेले तीन परिच्छेद लोक लेखा समितीच्या चर्चेसाठी प्रलंबित होते जे **तक्ता 1.1.4** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 1.1.4: लोक लेखा समितीद्वारे चर्चेसाठी प्रलंबित असलेले परिच्छेद

अहवालाचे वर्ष	लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदांची संख्या	लोक लेखा समितीमध्ये चर्चा झालेले परिच्छेद	लोक लेखा समितीमध्ये चर्चेसाठी प्रलंबित परिच्छेद
2015-16 पर्यंत	60	25	35
2016-17	01	00	01
2017-18	01	00	01
2018-19	01	00	01
एकूण	**63**	**25**	**38**
मार्च 2021 मध्ये संपलेल्या वर्षासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अनुपालन लेखापरीक्षण अहवालात 2019-21 या कालावधीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण साहित्य समाविष्ट			

उत्तरदायित्व कार्यतंत्र आणि वित्तीय प्रतिवेदन बाबी

उत्तरदायित्व कार्यतंत्र

1.8 सामाजिक अंकेक्षण

सामाजिक अंकेक्षण ही सातत्यपूर्ण आणि सतत चालू असणारी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये अंमलबजावणीच्या विविध स्तरांवर कामांच्या परिमाणाची आणि उच्च प्रतीच्या गुणवत्तेची पारदर्शकता, प्रकल्प, कायदा आणि धोरणाच्या अंमलबजावणीतील सार्वजनिक जबाबदारीची आणि प्राथमिक हितैषींच्या कार्यक्षम सहभागाची सुनिश्चिती केली जाते. लेखापरीक्षकांच्या आवश्यकतांसह या प्रक्रियेमध्ये लोक सहभाग आणि संनियंत्रण यांचा सहभाग देखिल असतो. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, 2005च्या खण्ड 15(5)(डी) नुसार ग्राम पंचायत अधिकारक्षेत्रातील सर्व कामांचे सामाजिक अंकेक्षण ग्राम सभेने करावयाचे असून सामाजिक अंकेक्षणादरम्यान उपस्थित झालेल्या सर्व अभिक्षणांवर त्वरित कृती करावयाची असते.

नियोजन विभागाने महाराष्ट्रामध्ये सामाजिक अंकेक्षण कक्षाची स्थापना केली (सप्टेंबर 2013). सामाजिक अंकेक्षण कक्षाचे प्रमुख हे संचालक असतात, ज्यांना एक सहाय्यक संचालक आणि तीन राज्य समन्वयक मदत करतात. शिवाय, ग्रामीण विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्य शासनाने संस्था नोंदणी अधिनियम, 1860 अंतर्गत महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण आणि पारदर्शकता संस्था स्थापन केली (जानेवारी 2018).

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे सामाजिक अंकेक्षण हे सामाजिक अंकेक्षण कक्षाने भाडयाने घेतलेल्या गट व ग्राम संसाधन व्यक्तिंच्या मदतीने केले जाते. गावाच्या सामाजिक अंकेक्षणाचा अहवाल ग्रामसभेत चर्चिला जातो व आवश्यक कारवाईसाठी जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) कडे सादर केला जातो. ग्राम सभा झाल्यापासून एक महिन्याच्या आत जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने कृती अहवाल सामाजिक अंकेक्षण कक्षाला सादर करणे आवश्यक असते.

सामाजिक अंकेक्षण कक्षाने सादर केलेल्या माहितीनुसार (जुलै 2022) 2021-22 मध्ये 6,120 ग्राम पंचायतींचे सामाजिक अंकेक्षण करण्याचे नियोजित करण्यात आले होते, त्यापैकी केवळ 5,366 ग्राम पंचायतींचे अंकेक्षण पूर्ण होऊ शकले. लेखापरीक्षणातील कमतरतेचा संबंध महाराष्ट्रातील कोविड-19 परिस्थितीमुळे ग्रामसभा आणि जन-सुनावणी घेण्यास बंदी तसेच पुरेसा निधी उपलब्ध न होण्याशी जोडण्यात आला. 39,303[7] कारवाईयोग्य बाबींसह हंगामी सामाजिक अंकेक्षण अहवाल जिल्हा कार्यक्रम समन्वयकांना सादर करण्यात आला. तथापि, ग्रामसभेत सामाजिक अंकेक्षण अहवालाला अंतिम स्वरूप न मिळाल्याने या मुद्द्यांवर जिल्हा कार्यक्रम समन्वयकांची कार्यवाही प्रलंबित आहे.

सामाजिक अंकेक्षण विभागाने लेखापरीक्षेतील निष्कर्षांवर कृती न केल्याने उत्तरदायीत्वाची खात्री देण्यासाठी सामाजिक अंकेक्षणाचा उपयोग क्षीण न होण्याकरता निष्कर्षांवर शीघ्रगतीने कारवाई करण्याची सुनिश्चिती करावी.

1.9 पंचायती राज संस्थांचे अंतर्गत लेखापरीक्षण आणि अंतर्गत नियंत्रण प्रणाली

परिणामकारक अंतर्गत नियंत्रण प्रणाली आणि कायदे, संहिता आणि नियमपुस्तिका यांचे काटेकोर पालन, त्रुटी व अनियमितता यांची जोखीम कमी करतात आणि अपव्यये, दुरुपयोग आणि गैरव्यवहार यांच्यापासून साधनसंपत्तीचे रक्षण करण्यास मदत करतात.

रोकड वही व पासबुक यांचा ताळमेळ न घेणे, दैनंदिन/मासिक रोकड वही बंद न करणे, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी रोकड वहीमधील नोंदी साक्षांकीत न करणे, विविध योजनांकरता स्वतंत्र रोकड वही (कॅशबुक) न ठेवणे, ऑनलाईन पोर्टलवर लेखे न ठेवणे, वार्षिक लेखे तयार करण्यातील विलंब यांचा विचार केल्यास **परिच्छेद 1.11.4** व **1.11.5** मध्ये चर्चिल्याप्रमाणे पंचायती राज संस्थांमधील अंतर्गत नियंत्रण अपर्याप्त होते.

1.10 उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे

मुंबई वित्तीय नियम, 1959 असे नमूद करतो की, विशिष्ट कारणांसाठी दिलेल्या अनुदानांची उपयोगिता प्रमाणपत्रे विभागीय अधिका-यांनी अनुदानित संस्थांकडून प्राप्त करावीत आणि पडताळणीनंतर, उपयोगिता प्रमाणपत्रे त्याच्या मंजुरीच्या दिनांकापासून 12 महिन्यांच्या आत संबंधित लेखा कार्यालयास म्हणजेच महालेखाकार कार्यालय (लेखा व अधिदान), महाराष्ट्र यांना अग्रेषित करावीत.

[7] वित्तीय दुर्विनियोग: 452, वित्तीय विचलन: 6,735, प्रक्रिया उल्लंघन: 27,999, तक्रारी : 4,117

जून 2022 पर्यंत ग्रामीण विकास विभागाकडून मार्च 2021 पर्यंत मुक्त केलेल्या ₹ 3,029.19 कोटी रक्कमेची 966 उपयोगिता प्रमाणपत्रे क्षेत्रीय कार्यालयांकडून सादरीकरणासाठी प्रलंबित होती. 966 प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रांपैकी ₹ 2,012.26 कोटी (66.43 टक्के) रक्कमेची 490 उपयोगिता प्रमाणपत्रे एक ते दोन वर्षांपासून, ₹ 699.76 कोटींची (23.10 टक्के) रक्कमेची 315 उपयोगिता प्रमाणपत्रे तीन ते चार वर्षांपासुन आणि ₹ 317.17 कोटी (10.47 टक्के) ची 161 उपयोगिता प्रमाणपत्रे पाच वर्षांहून अधिक काळ प्रलंबित होती.

1.11 वित्तीय प्रतिवेदन बाबी

1.11.1 निधीचा स्त्रोत

कर आणि करेतर महसुलाचे स्वतःचे स्त्रोत म्हणजेच जत्रेवरील कर, इमारतीवरील कर, शुल्क, जमीन आणि इमारतींवरील भाडे, पाणीपट्टी इत्यादी,आणि जमीनीच्या विक्रीतून मिळणारी भांडवली जमा, याशिवाय पंचायती राज संस्थांना राज्य शासन आणि भारत सरकारकडून सामान्य प्रशासन, विकास योजना/ कामे यांची अंमलबजावणी आणि ग्रामीण क्षेत्रात पायाभूत सुविधांची निर्मिती इत्यादीसाठी, सहाय्यक अनुदाने/ कर्जे यांच्या रुपात निधी प्राप्त होतो. केंद्र/ राज्य वित्त आयोग यांच्या शिफारसीनुसार सुद्धा निधी दिला जातो.

निधीच्या ओघाचे कार्यतंत्र **आलेख 2** मध्ये दर्शविले आहे.

आलेख 2: निधीचा स्त्रोत



2017-18 ते 2021-22 या कालावधीसाठी 34 पैकी 15[8] जिल्हा परिषदांच्या जमा आणि खर्च **तक्ता 1.1.5** मध्ये दर्शविला आहे.

[8] अकोला, अमरावती (2021-22 वगळता), औरंगाबाद (2021-22 वगळता बीड (वगळता) 2021-22), बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, जळगाव (2021-22 वगळता), लातूर, नांदेड, नाशिक, उस्मानाबाद, रत्नागिरी, सांगली आणि सातारा

तक्ता 1.1.5: 2017-18 ते 2021-22 दरम्यान पंचायती राज संस्थांची जमा आणि खर्च

(₹ कोटींत)

तपशील	2017-18	2018-19	2019-20	2020-21	2021-22
स्वत:चा महसूल	707.61	621.67	637.68	454.36	427.41
राज्य शासनाकडून प्राप्त झालेली अनुदाने	16,948.36	17,088.89	20,217.07	19,405.85	14,304.79
13[वा] वित्त आयोग	7.09	0.02	0.47	0.36	0.11
14[वा] वित्त आयोग	1,164.99	1,110.26	1,349.99	92.58	4.07
15[वा] वित्त आयोग	0	0	0	2,144.24	1,180.76
केंद्र शासनाची इतर अनुदाने	324.47	292.71	265.74	333.47	79.84
इतर जमा	251.15	766.31	229.74	403.53	997.42
एकूण जमा	**19,403.67**	**19,879.86**	**22,700.69**	**22,834.39**	**16,994.40**
स्वत:च्या महसुलाची टक्केवारी	**3.65**	**3.13**	**2.81**	**2.00**	**2.52**
एकूण खर्च	**17,897.97**	**18,434.16**	**21,786.37**	**21,078.77**	**15,514.20**
स्रोत: ग्रामीण विकास व पंचायत राज संस्थांनी सादर केलेली माहिती					

तक्ता 1.1.5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2017-18 पासून एकूण जमांमध्ये स्वत:च्या महसुलाच्या टक्केवारीने उतरता कल दर्शविला. उर्वरित 19 जिल्हा परिषदांच्या निधीची स्थिती सादर करण्यात आली नाही.

1.11.2 राज्य वित्त आयोगाच्या शिफारशी

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 243(I) नुसार प्रत्येक पाच वर्षांनी राज्य वित्त आयोगाची स्थापना करणे आवशक आहे.

2020-2025 या कालावधीसाठी मार्च 2018 मध्ये गठीत केलेल्या पाचव्या राज्य वित्त आयोगाने त्यांचा अहवाल शिफारसींसह सादर केला (ऑगस्ट 2019) जो राज्य विधिमंडळासमोर ठेवण्यात आला (डिसेंबर 2020).

एकूण 169 शिफारसींपैकी 91 शिफारसी (प्रत्यक्ष वित्तीय भार: 16, इतर: 75) पुर्णपणे मान्य केल्या गेल्या आणि 30 शिफारसी (प्रत्यक्ष वित्तीय भार- 13, इतर: 17) अंशत: मान्य केल्या गेल्या.13 शिफरसींवर अगोदरच कारवाई केलेली होती. उर्वरीत 35 शिफारसी शासनाने अमान्य केल्या.

वित्त आयोगाच्या मान्य केलेल्या शिफारसींवरील ग्रामीण विकास विभागाने केलेली कारवाई प्रलंबित आहे (डिसेंबर 2022).

1.11.3 केंद्रीय वित्त आयोगाच्या अनुदानांचा वापर

वर्ष 2015-16 ते 2019-20 दरम्यान चौदाव्या वित्त आयोगाने पंचायती राज संस्थांना ₹ 15,035.67 कोटी अनुदानाची शिफारस केली. अनुदानात दोन घटक म्हणजेच, सामान्य मुलभूत अनुदान[9] आणि सामान्य कार्यात्मक अनुदान[10] आहेत.

सामान्य कार्यात्मक अनुदान[11] प्राप्त करण्यासाठी ग्राम पंचायतींना महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण विकास विभागाकडून जारी (एप्रिल 2016) करण्यात आलेल्या शासन निर्णयातील अटी पूर्ण करणे आवश्यक होते.

पंधराव्या वित्त आयोगाने 2020-21 ते 2025-26 या कालावधीत राज्यातील पंचायती राज संस्थांना ₹ 22,713.00 कोटी[12] अनुदानाची शिफारस केली होती. या अनुदानात मूलभूत अनुदाने- अवबद्ध आणि बद्ध अनुदान या दोन घटकांचा समावेश होता. बद्ध अनुदान अंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी, ग्राम पंचायतींना भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या खर्च विभागाने जारी केलेल्या (जुलै 2021) शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक होते.

2019-22 या कालावधीत 34 पैकी 16[13] जिल्हा परिषदांना प्राप्त झालेल्या आणि वापरलेल्या अनुदानाचा तपशील **तक्ता 1.1.6** मध्ये देण्यात आला आहे.

---

9 मुलभूत अनुदानाअंतर्गत प्रत्येक ग्राम पंचायतींच्या हिश्श्यांचे वाटप (2011 ची जनगणना) अनुक्रमे लोकसंख्या आणि क्षेत्रफळाच्या 90:10 या प्रमाणात करावयाचे होते

10 सर्वसाधारण मुलभूत अनुदान- ₹ 13,532.11 कोटी आणि सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान ₹ 1,503.56 कोटी

11 (i) ग्राम पंचायतींचे अद्ययावत लेखे ठेवायचे होते आणि त्या वर्षापर्यंत (ज्या वर्षासाठी कार्यात्मक अनुदान सबंधित आहे त्याच्या दोन वर्षे आधी) लेखापरीक्षण करावयाचे होते, तसेच त्यात उत्पन्न/खर्च स्वतंत्रपणे दाखवावयाचे होते, आणि (ii) त्यांच्या स्वत:च्या स्त्रोतांकडून मागील वर्षीपेक्षा महसूलात वाढ होणे आवश्यक होते

12 मुलभूत अनुदान- ₹ 9085.20 कोटी आणि बद्ध अनुदान: ₹ 13,627.80 कोटी

13 अमरावती, बीड, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, लातूर, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, पालघर, परभणी, रायगड, सांगली, सातारा आणि उस्मानाबाद

तक्ता 1.1.6: 2019-20 ते 2021-22 मध्ये प्राप्त आणि वापरलेल्या अनुदानाचा तपशील

(₹ कोटींत)

वर्ष	अनुदानाची वर्गवारी	14व्या/15व्या वित्त आयोगाच्या शिफारशी	केंद्र शासनाकडून वितरीत केलेले प्रत्यक्ष अनुदान	राज्य शासनाकडून पंचायती राज संस्थांना वितरीत केलेले अनुदान	सादर केलेल्या उपयोगिता प्रमाणपत्रानुसार पंचायती राज संस्थांकडून विनियोग केलेले अनुदान	उपयोगात आणावयाची शिल्लक अनुदाने
2019-20 (14वा वित्त आयोग)	मूलभूत	4059.55	4059.55	4059.55	माहिती सादर केली नाही	माहिती सादर केली नाही
	कार्यात्मक	496.15	496.15	496.15		
2020-21 (15वा वित्त आयोग)	बद्ध/अवबद्ध अनुदाने	5827.00	5827.00	5827.00		
2021-22 (15वा वित्त आयोग)	बद्ध/अवबद्ध अनुदाने	4307.00	3014.90	3014.90		
एकूण	**मुलभूत**	**14689.7**	**13397.6**	**13397.6**		

स्रोतः 2021-22 च्या राज्य वित्तीय लेखापरीक्षण अहवालानुसार माहिती

1.11.4 अभिलेखे ठेवणे

1.11.4.1 रोकड वही

महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 च्या नियम 98 (2) (ii) नुसार, प्रत्येक आर्थिक व्यवहार झाल्यावर लवकरात लवकर त्याची नोंद रोकड वहीत करावयाची असते आणि त्यांची तपासणी केल्याचे प्रमाण म्हणून कार्यालय प्रमुखाने ती साक्षांकीत करावयाची असते. रोकड़ वही नियमितपणे बंद करून संपूर्णपणे तपासावयाची असते. पंचायती राज संस्थांच्या वर्ष 2021-22 मधील महालेखाकारांच्या स्थानिक लेखापरीक्षणात असे आढळून आले की, चाचणी तपासणी केलेल्या 90 कार्यालयांपैकी सहा कार्यालयांत (**परिशिष्ट 1.1**), रोकड वही दररोज/दरमहा बंद केली नव्हती, विविध योजनासाठी स्वतंत्र रोकड वही ठेवली नव्हती, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून दैनिक प्रविष्टयांचे नियमित साक्षांकन केले गेले नव्हते इत्यादी अनेक त्रुटी आढळून आल्या.

1.11.4.2 रोकड वहयांमधील शिलकींचा बँक पासबुकबरोबर ताळमेळ

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखे संहिता, 1968 च्या नियम 57 नुसार महिन्याच्या शेवटच्या कामकाजाच्या दिवशी रोकड वही बंद करून शिलकीचा ताळमेळ बँक पासबुकमधील शिलकीशी करावयाचा होता. वर्ष 2021-22 दरम्यान चाचणी- तपासणी केलेल्या 90 पैकी 13 (**परिशिष्ट 1.2**) कार्यालयांत रोकड वहीतील शिलकींचा ताळमेळ बँक पासबुक मधील शिलकींबरोबर घेतला गेला नव्हता.

1.11.5 पंचायती राज संस्थांद्वारे लेखे ठेवणे

जिल्हा परिषदेच्या वार्षिक लेख्यांमध्ये त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या पंचायत समितींच्या लेख्यांचा समावेश असतो. ज्या वर्षाशी लेखे संबंधित आहेत त्या वर्षाच्या नंतरच्या वित्तीय वर्षातील 10 जुलै रोजी किंवा त्यापूर्वी वार्षिक लेखे तयार करणे आवश्यक असते. जिल्हा परिषदेने मंजूर केलेले वार्षिक लेखे संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षक यांच्याकडून प्रमाणित केले जातात. प्रमाणित वार्षिक लेखे सुध्दा राज्य विधानमंडळात सादर करणे आवश्यक असते.

प्रत्येक ग्राम पंचायत स्वतंत्र वार्षिक लेखे तयार करते जे प्रमाणित झाल्यानंतरच्या पुढील वर्षाच्या 1 जून रोजी किंवा त्यापूर्वी पंचायत समितीकडे सादर करणे आवश्यक असते. मंजुरीसाठी लेखे ग्राम सभेमध्ये देखील सादर केले जातात आणि ग्राम सभेने दिलेल्या आदेशांचे अभिलेख ठेवून ते सरपंच व ग्राम पंचायतींच्या सचिवांनी पालन करणे आवश्यक असते.

1.11.5.1 वार्षिक लेखे तयार करण्यातील प्रलंबितता

मार्च 2023 पर्यंत 2017-18 या वर्षाचे सर्व जिल्हा परिषदांचे वार्षिक लेखे प्रमाणित करून ते राज्य विधिमंडळात ठेवण्यासाठी शासनाला सादर करण्यात आले होते. दोन जिल्हा परिषदांचे[14] वर्ष 2018-19 चे, तीन जिल्हा परिषदांचे[15] वर्ष 2019-20 चे आणि पाच जिल्हा परिषदांचे[16] वर्ष 2020-21 साठीचे आणि 32 जिल्हा परिषदांचे[17] वर्ष 2021-22 चे वार्षिक लेखे अद्याप शासनाला सादर करण्यात आले नव्हते.

मार्च 2023 पर्यंत 18[18] जिल्ह्यांतील 14,433 ग्राम पंचायतींच्या 2016-21 या कालावधीतील वार्षिक लेख्यांना ग्रामसभेने मान्यता दिली आणि संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा ह्यांनी ते प्रमाणित केले.

1.11.5.2 पंचायती राज संस्थांच्या लेख्यांचे नमुने

ग्रामीण विकास व पंचायत राज विभागाने सर्व जिल्हा परिषदांनी आणि ग्राम पंचायतींनी त्यांचे वार्षिक लेखे हे पंचायती राज मंत्रालयाने विहित केलेल्या आदर्श लेखांकन प्रणाली नमूना I ते VIII[19] मध्ये ठेवणे बंधनकारक (ऑक्टोबर 2013) केले आहे.

---

14 बीड आणि बुलढाणा

15 बीड, बुलढाणा आणि नंदुरबार

16 अमरावती, धुळे, लातूर, सिंधुदुर्ग आणि वाशिम

17 अहमदनगर, अकोला, अमरावती, बीड, भंडारा, बुलढाणा, चंद्रपुर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, पालघर, परभणी, पुणे, रायगड, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ

18 अहमदनगर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, जळगाव, कोल्हापूर, नागपूर, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे आणि वर्धा

19 जमा व खर्च (एमएएस-I), मुख्यशीर्ष-निहाय एकत्रित गोषवारा (एमएएस-II), मासिक ताळमेळ विवरण (एमएएस-III), प्राप्य व प्रदाने (एमएएस-IV), अचल मत्ता/संपत्ती (एमएएस-V), चल मत्ता/संपत्ती (एमएएस-VI), स्टॉक व इन्व्हेंटरी (एमएएस-VII), आणि मागणी, संकलन व शिल्लक (एमएएस-VIII)

16 जिल्हा परिषदांतील[20] ग्राम पंचायती त्यांचे लेखे आदर्श लेखांकन प्रणाली नमूना I ते VIII मध्ये ठेवत होत्या. सातारा जिल्हा परिषदेतील ग्राम पंचायती केवळ आदर्श लेखांकन प्रणाली नमूना I ते III मध्ये, तर ठाणे जिल्हा परिषदेच्या ग्राम पंचायती केवळ आदर्श लेखांकन प्रणाली नमूना I ते IV मध्ये त्यांचे लेखे ठेवत होते. जिल्हा परिषदा, बुलढाणा आदर्श लेखांकन प्रणाली नमून्यामध्ये त्यांचे लेखे ठेवत नव्हते. 15 जिल्हा परिषदांनी[21] माहिती दिली नाही (सप्टेंबर 2022).

1.11.5.3 ई-ग्रामस्वराजमध्ये वार्षिक लेखे न ठेवणे

भारत सरकारच्या ग्राम विकास मंत्रालयाने राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राच्या सहकार्याने पंचायती राज संस्थाच्या खात्यांचे ऑनलाइन अभिलेखे ठेवण्यासाठी पंचायती राज संस्था लेखा सॉफ्टवेअर अर्थात 'प्रियासॉफ्ट' (आता ई-ग्रामस्वराज असे नामकरण) नावाचे वेब पोर्टल तयार केले होते. पंचायती राज संस्थांनी ई-ग्रामस्वराज मध्ये लेख्यांची माहिती नियमितपणे प्रविष्ट करावयाची होती. पंचायती राज संस्थांनी सर्व माहिती ई-ग्रामस्वराजमध्ये अपलोड केली आहे यांच्या सुनिश्चिततेची जबाबदारी जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर आहे.

34[22] पैकी 16 जिल्हा परिषदांनी सादर केलेल्या माहितीनुसार, ई-ग्रामस्वराजमध्ये ठेवलेल्या लेख्यांची स्थिती **तक्ता 1.1.7** मध्ये दिली आहे.

तक्ता 1.1.7: ई-ग्रामस्वराजमध्ये ठेवलेल्या लेख्यांची स्थिती

कालावधी	जिल्हा परिषदांची संख्या	जिल्हा परिषदांचे नाव
2013-14 ते 2019-20	6	सातारा: 2013-14 पर्यंत; नंदुरबार: 2014-15 पर्यंत; रत्नागिरी: 2015-16 पर्यंत; बीड: 2016-17 पर्यंत; जळगाव: 2018-19 पर्यंत; ठाणे: 2019-20 पर्यंत
2020-21	3	लातूर, सिंधुदुर्ग, सोलापूर
2021-22	7	अकोला, बुलढाणा, धुळे, नागपूर, नांदेड, धाराशिव, सांगली
एकूण	**16**	
स्त्रोत: जिल्हा परिषदांनी सादर केलेली माहिती		

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षेने सादर केलेल्या माहितीनुसार, 27,832 पैकी 10,072 (12[23] जिल्ह्यांतील) ग्राम पंचायती ई-ग्रामस्वराज पोर्टलवर लेखे ठेवत होत्या.

20 अमरावती, औरंगाबाद, बीड, धुळे, गडचिरोली, जळगाव, लातूर, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, पुणे, रत्नागिरी आणि सोलापूर

21 अहमदनगर, अकोला, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, हिंगोली, जालना, कोल्हापूर, पालघर, रायगड, सांगली, सिंधुदुर्ग, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ

22 18 जिल्हा परिषदांनी माहिती सादर केली नाही: अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, कोल्हापूर, नाशिक, पालघर, परभणी, पुणे, रायगड, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ

23 भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, जळगाव, कोल्हापूर, नागपूर, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर आणि वर्धा

17[24] जिल्ह्यांची माहिती सादर करण्यात आली नाही. उर्वरित पाच[25] जिल्ह्यांच्या बाबतीत असे नमूद करण्यात आले की बहुतांश ग्राम पंचायती ई-ग्रामस्वराजमध्ये लेखे ठेवत नव्हत्या.

1.11.6 संक्षिप्त आकस्मिक देयक व तपशीलवार आकस्मिक देयकांशी संबंधीत मुद्दे

महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 नुसार आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी संक्षिप्त आकस्मिक देयकांवर आहरित केलेल्या रक्कमेची तपशीलवार देयके (अंतिम खर्चाच्या पुष्टयर्थ प्रमाणकांसह) 30 दिवसांच्या आत महालेखाकार कार्यालय (लेखे व अधिदान), महाराष्ट्र यांना सादर करणे आवश्यक होते.

डिसेंबर 2022 पर्यंत, ग्रामीण विकास विभागाशी संबंधित ₹ 1.82 कोटी अंतर्भूत असलेली दोन तपशीलवार देयके तीन वर्षांहून अधिक काळ प्रलंबित होती.

24 अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, धुळे, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, वाशिम आणि यवतमाळ

25 पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि ठाणे